CMYK

दै.बीड

www.beedsuperfast.com

# सुपरफास्ट

संपादक : अतुल शंकरराव जाधव

| बीड (महाराष्ट्र) | वर्ष ३ | अंक ३२५ | रविवार दि. ३० नोव्हेंबर, २०२५ | RNI : MAHMAR/2023/84694 | पाने ४ | किंमत ४ रु. |
|---|---|---|---|---|---|---|
| BEED (Maharashtra) | Year-3 | Issue-325 | Sunday 30 November, 2025 | RNI : MAHMAR/2023/84694 | Pages 4 | Price 4 |


## उद्या फडणवीस बीडमध्ये



**बीड । प्रतिनिधी**

दि.२८ : बीड नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्षाने जोरदार तयारी सुरू केली असून, या प्रचारातील महत्त्वाचा टप्पा म्हणून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची बीडमध्ये १ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता विजय संकल्प सभा आयोजित करण्यात आली आहे. या विजय संकल्प सभेमुळे भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ.ज्योतीताई रविंद्र घुमरे यांच्यासह नगरसेवकांच्या विजयावर शिक्कामोर्तब होणार आहे. या सभेला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, भाजपचे आमदार, पदाधिकारी, नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी » पान २ वर

# परळीत रोजगार निर्मिती अन् विकास हाच माझा अजेंडा : आमदार धनंजय मुंडे



## परळी शहरातील आझाद नगर भागात आमदार धनंजय मुंडेंच्या कॉर्नर बैठकीस सभेचे स्वरूप

### आझाद नगर भागातील जनतेने मला जे प्रेम दिले, तसेच प्रेम नगराध्यक्ष व सदस्य पदांच्या उमेदवारांना देण्याचे आवाहन

**परळी वै. । प्रतिनिधी**

औष्णिक विद्युत केंद्रात मेगा सोलर प्रकल्प उभारणे, सिमेंट फॅक्टरी, शासकीय शिक्षण संस्था, वैद्यनाथ मंदिर पर्यटन अशा विविध माध्यमातून रोजगार निर्मिती करणे आणि शहराचा विकास करणे, हा आमचा अजेंडा आहे. जाती - धर्माचे राजकारण करणे मला कधीच जमले नाही, म्हणूनच परळीची जनता माझ्या पाठीशी आजवर खंबीर पणाने उभी राहिली आहे. आज नगर परिषद निवडणुकीत देखील मी विकासाचा अजेंडा घेऊन मत मागत आहे. पुन्हा इथली जनता कुणाच्याही बुद्धिभेदाला बळी न पडता विकासाच्या मागे उभी राहील, इथल्या मातीची आणि माणसांची सर्वत्र बदनामी करणाऱ्यांना मतातून उत्तर देईल, असा विश्वास माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी परळी शहरातील

आझाद नगर येथील कॉर्नर सभेत बोलताना व्यक्त केला. परळी नगर परिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, भाजप, शिवसेना (शिंदे गट), रिपाइं (आठवले गट) व मित्र पक्ष महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, प्रभाग ८ मधील अधिकृत उमेदवार महानंदा व्हावळे, शकील कुरेशी, प्रभाग ९ मधील उमेदवार कार्तिक कांबळे, खैसरबी राजा खान यांच्या प्रचारार्थ शहरातील आझाद नगर येथे आयोजित कॉर्नर बैठकीस अक्षरशः जाहीर सभेचे स्वरूप आले होते. इथल्या लोकांच्या घरात पाणी किती वाजता येते, त्याची माहिती मला असते, कारण इथल्या प्रत्येक माणसाशी मी थेट जोडलेला आहे. इथल्या जनतेने मला हजारो मतांची आघाडी विधानसभेत दिली तशीच माझ्या प्रत्येक » पान २ वर

## बाळासाहेब गुंजाळ यांना हक्काचा नगरसेवक म्हणून निवडून देण्याचा मतदारांचा निर्धार

### प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद ; कॉर्नर सभा, बैठकांवर जोर

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक २१ ब मधील राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना शिंदे गट, शिवसंग्राम मित्र पक्षाचे उमेदवार धर्मराज उर्फ बाळासाहेब गुंजाळ यांनी केलेला विकास, लोकांसाठी केलेली मदत हा मतदारांच्या चर्चेचा विषय ठरत आहेत. स्थानिक स्तरावर त्यांच्या कामकाजाची पद्धत आणि सर्वच जाती धर्मातील नागरिकांशी असलेला संवाद, सलोख्याचे संबंध यामुळे त्यांचा प्रभाव वाढू लागला आहे. त्यांच्या कॉर्नर सभा आणि बैठकांना देखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळू लागला आहे. बाळासाहेब गुंजाळ यांनी गेल्या काही वर्षांत प्रभागातील



मूलभूत सुविधा सुधारण्यावर भर दिलेला आहे. रस्ते दुरुस्ती, पाईप लाईन दुरुस्ती, पाणीपुरवठ्याची सुधारणा, नाल्यांची स्वच्छता, तसेच स्ट्रीट लाईटची कामे करून घेणे अशा वैयक्तिक आणि प्रभागस्तरावर परिणाम करणाऱ्या कामांना प्राधान्य दिल्याने त्यांच्याबद्दल मतदारांमध्ये सकारात्मकता निर्माण झाली आहे. याशिवाय, कोणत्याही समस्येसाठी सहज उपलब्ध राहणे, तातडीने प्रतिसाद देणे आणि दिवसभर प्रभागात फिरून नागरिकांशी थेट संवाद साधणे हा त्यांच्या कामाचा » पान २ वर

## अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर गेवराई पोलिसांच्या ताब्यात

**गेवराई । प्रतिनिधी**

दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ रोजी रात्री १०.४५ वाजता गेवराई पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार अवैधरित्या वाळू चोरी करून वाहतूक करणाऱ्या एका ट्रॅक्टरला रंगे हात पकडण्यात यश मिळवले. मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी गेवराई शहर परिसरात गस्त वाढवली असता, कोणतीही परवानगी न घेता विना-नंबर ट्रॅक्टरमधून अवैध वाळूची वाहतूक होत असल्याचे निदर्शनास आले. तात्काळ कारवाई करत पोलीस पथकाने ट्रॅक्टर चालक विलास मनोहर शिंदे (रा. नवी नागझरी, वय २७) याला ताब्यात घेतले.स्थळी पंचनामा करून ट्रॅक्टर तसेच त्यातील अवैध वाळू जप्त करण्यात आली. या प्रकरणी चालकाविरुद्ध भा.न्या.सं.



कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ट्रॅक्टर व वाळूसह मिळून एकूण ५ लाख ६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई माननीय पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी कटके साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. कारवाईत पोलीस निरीक्षक किशोर पवार, एपीआय कोटकर, पोउपनी प्रदीप आढाव, पोहवा अशोक हंबर्डे यांनी सहभाग घेतला.या प्रकरणाचा पुढील तपास पोउपनी आढाव हे पोनि किशोर पवार यांच्या मार्गदर्शनाखाली करत आहेत.

## शहरातील प्रभाग २३ मध्ये हाफिज अशफाक यांच्या प्रचाराला नागरिकांचा जोरदार प्रतिसाद

### हाफिज अशफाक यांचा डोअर टू डोअर प्रचार

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी चांगलीच रंगत चालली असून मतदानाला अवघा काहीच दिवस उरले आहेत. येत्या दोन तारखेला होणाऱ्या मतदानासाठी सर्वच राजकीय पक्षांनी घर ते घर संपर्क मोहीम जोरात सुरू केली आहे. प्रत्येक पक्षाचा उमेदवार मतदारांच्या दारात जाऊन आपले विचार मांडत असून नागरिकांनाही या निवडणुकीबाबत मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक २३ मध्ये हाफिज अशफाक यांची प्रचारमोहीम विशेष लक्षवेधी ठरत आहे. हाफिज अशफाक हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाचे घड्याळ या चिन्हावर निवडणूक लढवत आहेत.ते मागील काही दिवसांपासून सातत्याने डोअर टू डोअर भेटी देत असून मतदारांशी प्रत्यक्ष संवाद साधत



आहेत. त्यांच्या या जिद्दीच्या आणि सकारात्मक प्रचारशैलीला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. नागरिकांकडून मिळणाऱ्या या पाठिंब्यामुळे प्रभाग २३ मध्ये हाफिज अशफाक यांची चर्चा अधिकच वाढली आहे. सर्वसामान्यांपासून ते तरुण मतदारांपर्यंत अनेक जण त्यांना प्रत्यक्ष भेटून पाठिंबा व्यक्त » पान २ वर

## प्रभाग २६ मध्ये पठाण बिलाल सादिक खान यांची पतंगाची विजयच्या दिशेने गगन भरारी!

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी चांगलीच रंगात आली असून येत्या दोन तारखेला मतदान होणार आहे. सर्वच पक्षांचे उमेदवार मतदारांच्या दारात जाऊन आपल्या प्रचाराचा धडाका सुरू ठेवत आहेत. प्रभाग क्रमांक २६ मध्ये मात्र एम आय एम पक्षाचे नगरसेवकपदाचे उमेदवार पठाण बिलाल सादिक खान यांची उमेदवारी सध्या विशेष चर्चेचा विषय ठरत आहे.

पठाण बिलाल सादिक खान हे एम आय एमच्या पतंग या चिन्हावर निवडणुकीच्या रिंगणात





उतरले असून गेल्या काही दिवसांपासून ते प्रभागात डोअर टू डोअर संपर्क मोहीम राबवत आहेत. घराघरांत जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेण्यासोबतच त्या सोडवण्यासाठी ठोस काम करण्याचे आश्वासन ते देत आहेत.प्रभाग २६ मध्ये खान यांच्या या सक्रिय प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. विशेषतः युवकवर्ग व स्थानिक नागरिकांकडून त्यांना मिळणारा प्रतिसाद पाहता त्यांच्या उमेदवारीला चांगली गती मिळाल्याचे राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.बीड नगरपालिकेच्या निवडणुकीचा तापलेला माहौल अशा प्रचारमोहीमेमुळे अधिकच रंगतदार बनला असून प्रभाग २६ मधील निकालाविषयी उत्सुकता वाढली आहे.

## प्रभाग ०६ मध्ये 'तुतारी'ची जोरदार गर्जना

### जलील पठाण यांच्या प्रचाराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेची निवडणूकीचे मतदान अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले असून शहरातील राजकीय वातावरण तापले आहे. सर्वच पक्षांनी प्रचाराचा जोर वाढवला असून राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) यांना बीड शहरात विशेषतः उत्तम प्रतिसाद मिळत आहे. आमदार संदीप भैय्या क्षीरसागर आणि पक्षाचे ज्येष्ठ नेते माजी आमदार सय्यद सलीम हे विविध प्रभागांमध्ये भेटी देत नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत. काल प्रभाग क्रमांक ०६ मध्ये



आयोजित करण्यात आलेली कॉर्नर बैठक नागरिकांच्या प्रचंड उपस्थितीमुळे थेट सभेत रूपांतरित झाली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे अधिकृत उमेदवार पठाण जलील खान यांच्या प्रचारार्थ आमदार संदीप क्षीरसागर यांनी संबोधन करताना तुतारी या चिन्हावर मतदान करून सर्व उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. जलील पठाण हे अनेक वर्षांपासून प्रभाग ०६ चे सक्षम प्रतिनिधित्व करत असून उत्कृष्ट नगरसेवक म्हणून त्यांना मिळालेले पुरस्कार त्यांच्या कार्याची साक्ष देतात. यामुळेच स्थानिक नागरिकांमध्ये जलील लाला फिरसे अशी घोषणा घुमत असून यंदाही त्यांना मोठा पाठिंबा मिळेल, अशी चिन्हे दिसत आहेत.प्रभाग ०६ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या तुतारीला मिळणारा हा उत्स्फूर्त प्रतिसाद आगामी निवडणुकीत पक्षाला बळ देणारा ठरणार आहे.

## प्रभाग ११ मध्ये आमराईमधून मुदस्सिर चाऊस यांना एकतर्फी पाठिंबा

**बीड । प्रतिनिधी**

प्रभाग ११ मधील अत्यंत निर्णायक मानल्या जाणाऱ्या आमराई भागात अपक्ष उमेदवार मुदस्सिर नासेर चाऊस यांच्या समर्थनाची प्रचंड लाट उसळली असून, महिलावर्गाचा उत्स्फूर्त सहभाग आणि घराघरातील झालेल्या प्रचारामुळे या निवडणुकीत त्यांचा विजय निश्चित असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

आमराईचा मतदान कल नेहमीच निर्णायक राहिला आहे आणि आमराईचा कल जिथे, विजय तिथे ही धारणा वर्षानुवर्षे पक्की मानली जाते. यावेळी हा कल पूर्णपणे मुदस्सिर चाऊस यांच्या बाजूने एकतर्फी झुकलेला दिसत आहे. महिलावर्गाने घेतलेला





### महिलांचा उस्फूर्त सहभाग, राहुल दुबाले यांनी जाहीर केला पाठिंबा


पुढाकार, स्वयंप्रेरणेने केलेला प्रचार आणि उमेदवारावरील विश्वास यामुळे संपूर्ण वातावरण त्यांच्या बाजूने मजबूत झाले आहे. याच दरम्यान निवडणुकीतील सर्वात महत्त्वाची आणि चर्चेतील घटना म्हणजे -पोलीस बॉईज संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राहूल दुबळे यांनी मुदस्सिर चाऊस यांना अधिकृत पाठिंबा जाहीर केला आहे.राहूल दुबळे यांनी सार्वजनिकरित्या जाहीर केलेल्या या समर्थनामुळे युवकांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला असून, हा पाठिंबा निवडणूक समीकरणांना निर्णायक दिशा देणारा ठरणार आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, मुदस्सिर » पान २ वर

CMYK

# निवडणुकांतून काय मिळते हे महत्त्वाचे!

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचे भवितव्य आरक्षणाबाबत सर्वोच्च न्यायालयाचा निकाल काय येतो यावर अवलंबून आहे. तर सध्या सुरू असलेल्या निवडणूक कार्यक्रमाच्या प्रचाराचा भर 'राज्याची सत्ता आमच्याकडे आहे आणि तिजोरीच्या चाव्याही आहेत तेव्हा मतदान करताना विचार करा', असा आहे. आरक्षणाचा विषय राजकारणाने गुंतागुंतीचा केल्याने सर्वोच्च न्यायालय काय निकाल द्यायचा तो देईल, पण राजकीय आघाड्या आणि युती ही खरे तर महानगर, नगरपालिका आणि जिल्हा परिषदांची मक्तेदारी. स्थानिक समीकरणे गुंतागुंतीची असल्याने नको असलेल्यांना सत्तेबाहेर ठेवण्यासाठी मातब्बर नेतेमंडळी अचाट आणि अफाट राजकीय आघाड्या बनवत आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमधील सत्ता ताब्यात ठेवत. पण १९९५ नंतर राज्य पातळीवर आघाडी आणि युतीची सत्ता अपरिहार्य बनत गेली तसतसे स्थानिक निवडणुकांचा रागरंग बदलत गेला. आज नगरपालिका, नगर पंचायत निवडणुकीत भाजपा, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस आपापसातच संघर्षाची भूमिका घेत असल्याने एक नेता म्हणतो तिजोरीच्या चाव्या माझ्याकडे, तर दुसरा म्हणतो तिजोरीचा मालक आमच्याकडे आणि तिसरा म्हणतो नगरविकास माझ्याकडे असल्याने आवाज माझाच चालेल. आता यात विरोधी पक्षाला नेमकी भूमिका काय, हा मोठा प्रश्नच आहे. लोकांचे लक्ष वेधून घेणे ही निवडणुकीतील कला असते. आपण जेवढे चर्चेत राहू तेवढे मतदारांचे लक्ष आपल्याकडे वळते आणि त्याचा कळत-नकळत परिणाम मतदानावर होतो हा उद्देश असतो. १९९९ ते २०१४ च्या दरम्यान काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसने हाच प्रयोग केला. त्यावेळच्या प्रचारात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व इतर ज्येष्ठ





एकामेकांवर कुरघोडी करताना दिसले व तसे निकालही लागले. आताही तेच सुरू आहे. नवे काय आहे, तर राज्याची तिजोरी. ९ लाख कोटीहून अधिक कर्जाने वाकलेल्या तिजोरीतून विकास कामांवर नेमका किती खर्च होतो याचा अभ्यास करण्यास विरोधकांना वेळ नसल्याने त्याचा लेखाजोखा समोर येण्याचे कारण नाही. बहुतेक सर्व मोठी विकासकामे कर्जातून सुरू आहेत. केंद्र सरकारच्या 'हुडको' या उपक्रमाने गेल्या काही वर्षांत पायाभूत सुविधा विकासकामांसाठी किती कर्जाऊ रक्कम दिली याचा अभ्यास केला तरी पुरे आहे. सध्या विरोधी पक्ष मतदार याद्यांतील त्रुटी शोधण्याकामी लागला आहे. तो अभ्यास संपेल तेव्हा त्यांचा प्रचार काय असेल हे ठरणार आहे. दुसऱ्या बाजूला सत्तापक्षाचा प्रचाराचा धडाका सुरू आहे. त्यांचे अनेक उमेदवार बिनविरोध निवडून येत आहेत. अधिकाधिक सदस्य निवडून आणत पालिकांसह इतर स्थानिक स्वराज्य संस्था ताब्यात घेणे, पुढे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधान परिषेदवर निवडून द्यावयाच्या जागांची निश्चिती करणे आणि परिषदेत विरोधकांची अवस्था विरोधी पक्षनेतेपद सुद्धा मागता येणार नाही, अशी केविलवाणी करणे असाच अजेंडा दिसून येतो आहे. खरेतर विरोधी पक्षाला फारसे काम दिसत नाही. मतदार यादी, निवडणूक आयोग इथून सुरू झालेले त्यांचे प्रश्न आपले लोक अचानक माघार कसे घेतात आणि सत्ताधारी बिनविरोध कसे काय निवडून येतात यात गुंतत चालले आहेत. भरीस भर म्हणून मतदारांची त्यांच्याबद्दलची सहानुभूती किती काळ टिकेल हा ही प्रश्न आहे. कारण थेट रक्कम हातात देणाऱ्या अनेक योजना लोकांना भुलवून टाकत आहेत. सध्या गावोगावी भजनी मंडळांना निधीवाटप सुरू होत आहे. त्यासाठी राज्य सरकारने साडेचार कोटी रुपये मंजूर केले आहेत. भजनी मंडळातील लोक आपल्याला 'पगार' सुरू होतोय या खुशीत आहेत. सोबत लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, याची हमी सरकारकडून दिली जात आहे. १०-१२ अशाच योजना आहेत. भविष्यात काय वाढून ठेवलेय या पेक्षा महिन्याला बँक खात्यात काय जमा होतेय हे पाहणे हाच अनेकांचा प्राधान्यक्रम बनू पाहत असल्याने यापुढे सतत निवडून येण्यासाठी अशाच योजना कामी येणार. मग विरोधी पक्षाला कामच काय आहे? तसेही त्यांच्यातले अभ्यासू, ज्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐकले जाते असे किती लोक सध्या सक्रीय आहेत? जे होते त्यांचा चांगलाच बंदोबस्त झाला आहे. लोकांना जे हवेय तेच दिले जातेय. काही वर्षांपूर्वी राज्याच्या राजकारणातले एक बडे प्रस्थ असलेल्या व्यक्तीने सांगितलेला हा किस्सा महत्त्वाचा वाटावा. नागपूरच्या हिवाळी अधिवेशन काळात पश्चिम महाराष्ट्रातल्या त्या नेत्याला तिथल्या एका प्रभावशाली नेत्याने आपल्या स्थानिक की शेतघरी निमंत्रित केले. ते घर पाहून नेते अचंबित झाले. तुम्ही अशा भपकेबाज घरात राहता ते लोकांना खटकत नाही का, असा सवाल करत ते म्हणाले की आमच्या गावात असे घर बांधले तर लोक आम्हाला कायमचे घरात बसून राहण्यासाठी निवृत्त करतील. तेव्हा त्या यजमान नेत्याने दुसरा एक किस्सा पाहुण्याला ऐकवला. ते म्हणाले की, आमच्याकडे एका प्रमुख राजकीय पक्षाने सोज्वळ प्रतिमेच्या नेत्याला एका महत्त्वाच्या निवडणुकीत उमेदवारी दिली. एका प्रचारसभेत त्या नेत्याने स्वतःचे बँक पासबुक काढले व लोकांना दाखवत ते म्हणाले की पहा मी काही इतरांसारखा पैशाने मातब्बर नाही. पण निवडून आल्यास माझी बांधिलकी तुमच्याप्रती असेल. पण मतदारांत चर्चा अशी झाली म्हणे की याच्याकडे आताच काही नाही, हा पुढे तरी आपल्याला काय देणार आणि हा नेता दणकून पडला. हा किस्सा ऐकल्यावर पाहुणा नेता निःशब्द झाला. निवडणुका महाग झाल्या ही चर्चा काही नवीन नाही. तसे का झाले हे सर्वज्ञात आहे. सरकारने निवडणूक खर्च करावा अशी मागणी केली जात होती. पण आता मतदारांसाठी थेट निधीच्या लोकप्रिय योजनांचा मारा सुरू असल्याने ती वेगळ्या अर्थाने पूर्ण झाली असे म्हणता येऊ शकते. दुरगामी परिणाम करणारी, सर्वसामान्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणारी किती कामे आपण केली व विकास योजनांचा निधी राज्याच्या उत्पन्नात वाढ करून मिळवलाय व काही वर्षांनंतर कर्ज काढण्याची गरजच भासणार नाही असे ठामपणे म्हणता येईल का? या चर्चेत आता कोणाला रसही दिसत नाही. २६ नोव्हेंबर हा संविधान दिवस म्हणून आपण साजरा करतो. कारण या दिवशी संविधान सभेने देशाची राज्यघटना स्वीकारली. ती अर्पण करताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, राजकारणात आपण एक व्यक्ती, एक मत व एका मताचे एक मूल्य हे तत्व मानणार असू पण सामाजिक आणि आर्थिक रचनेमुळे ते नाकारणार असू.... तर याचा अर्थ आपण आपली राजकीय लोकशाही संकटात टाकत आहोत असे होईल. हे विधान सध्याच्या वातावरणात सामाजिक व आर्थिक समता प्रस्थापित होते का, याचा विचार करणारांसाठी महत्त्वाचे आहे. एकीकडे प्रगतीचे आकडे डोळे दिपविणारे असले तरी ठराविक काही वर्षांनी मेळघाट, चिखलदरा व नंदुरबारमधील कुपोषण आणि बालमृत्युंच्या बातम्या आपला पिच्छा सोडत नाहीत. अलीकडेच ६५ बालकांचा मृत्यू झाल्याचा विषय मुंबई उच्च न्यायालयासमोर आला. त्यावर गंभीर चिंता व्यक्त झाली व काही विभागाच्या सचिवांना अमरावतीतल्या कुपोषणग्रस्त भागाचा दौरा करून तेथील परिस्थितीची पाहणी करण्याचे आदेश दिले गेले आहेत. आपण सामाजिक आणि आर्थिक समता प्रस्थापित करू शकलोय का, याचे उत्तर यातूनच शोधायचे आहे.

पान १ आणि ४ वरुन...

पान १ आणि ४ वरुन...

### परळीत रोजगार निर्मिती...

निवडणुकीत दिली. त्यामुळे त्यांची अखेरच्या श्वासापर्यंत सेवा करणे, हा माझा धर्म आहे, असेही धनंजय मुंडे म्हणाले. आगामी काळात विकासाची ग्वाही आणि जनतेचा विश्वास सार्थकी लावायचा शब्द देतो, असेही श्री. मुंडे म्हणाले. यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांचे प्रतिनिधी बाजीराव धर्माधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष अय्युब भाई पठाण, डॉ. संतोष मुंडे, रिपाइंचे सचिन कागदे, जाफर खान, राजा खान, अजीज कच्छी, नाझर भाई, शकील कच्छी, भीमा पोळ, युनूस बेग, राहुल घोबाळे, अल्ताफ पठाण, अनंत इंगळे, रवी मुळे, महेबुब कुरेशी, माधवराव ताटे, जावेद कुरेशी, शरण मस्के प्रभाग क्र ८ मधील उमेदवार महानंदा व्हावळे, शकील कुरेशी, प्रभाग क्र ९ मधील उमेदवार कार्तिक कांबळे, खैसर राजा खान यांसह पदाधिकारी व स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गेवराईत पवारांनी काय...

बोलतात हीच मोठी शोकांतिका, असे पवारांनी कठोर शब्दांत म्हटले. आमदार झाले तर वर्षभरात आम्ही कोट्यवधी रुपये आणत असल्याची गर्जना करतात, पण हे विसरू नका लक्ष्मण पवार प्रत्येक वर्षी ४०० कोटी रुपयांचा निधी आणत होते हे तालुक्यातील सर्व जनतेला माहीत आहे.गेवराईच्या राजकारणात संपूर्ण आयुष्य घालवूनही काहीच साध्य न झाल्याने पंडितांना जनता कधीच स्वीकारत नाही आणि पुढेही स्वीकारणार नाही.

एवढ्यावर न थांबता पवारांनी धक्कादायक आरोप करत सांगितले की, मार्केट कमिटीतून दरवर्षी ५ ते ७ कोटी रुपये तुम्ही खाता. माणूस किती निर्दयी असावा हे अमरसिंह पंडितांकडे पाहिल्यावर कळतं, असा टोला त्यांनी लगावला. आपल्या भूमिकेवर बोलताना पवार म्हणाले, माझं एकच स्वप्न फक्त माझं गाव सुखी असावं. मला पदांची इच्छा नव्हती, आजवर मी सहा नगराध्यक्ष, साठ नगरसेवक आणि एक आमदार घडवला आहे. शेवटी मतदारांना आवाहन करत पवार म्हणाले, जात-पातीला मत देऊ नका. संविधान, स्वाभिमान आणि गेवराईच्या सवरक्षणासाठी भाजपला मतदान करा. नगरपरिषद पंडितांच्या ताब्यात म्हणजे जनता त्यांच्या ताब्यात जाते, हे विसरू नका. म्हणून येत्या २ तारखेला कमळ या चिन्हासमोरील बटन दाबून भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी पवार व नगरसेवक पदाच्या सर्वच उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करा, असे शक्तीशाली आवाहन करत पवारांनी सभा दणाणून सोडली.

### प्रसिद्धीसाठी बिनबुडाचे आरोप...

राजकीय हेतुपुरस्सर रंग देण्याचा प्रयत्न असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जरांगे पुढे म्हणाले की,राम खाडे यांच्यावर झाला तो हल्ला अत्यंत गंभीर असून त्याची सखोल चौकशी व्हावी, याबाबत कोणालाही दुमत नाही. पण त्या घटनेचा संबंध नसताना आमदार धस यांना मुद्दाम टार्गेट करण्याचा प्रयत्न केला जात आहे. नाहक बदनामी करण्याची ही प्रवृत्ती अत्यंत केविलवाणी आहे. सोशल मीडियावर काही लोक राजकीय फायद्यासाठी आमदार धस यांच्यावर दररोज सकाळ, दुपार, संध्याकाळी उठसूट कोणतेही आणि कसलेही खोटे आरोप करत असल्याचा आरोप करत, ठोस पुरावे नसताना माध्यमांत येऊन बदनामी करण्याचा प्रयत्न करणे ही गंभीर बाब आहे. अशांवर योग्य कायदेशीर कारवाई करावी असेही जरांगे यांनी सांगितले.

### परळीचा विकास जिंकावा...

महेश मुंडे, कुसूमबाई चाटे, प्रभाग ६ चे अंजली बनसोडे, व्यंकटेश शिंदे, प्रभाग १६ च्या सारिका हरंगुळे, तकी खान, प्रभाग १४ चे पवन मुंडे आणि पूजा प्रितेश तोतला यांच्या प्रचारार्थ कॉर्नर सभा घेतल्या, त्यावेळी त्या बोलत होत्या. ना. पंकजाताई बोलताना पुढे म्हणाल्या की, परळी शहर, इथली जनता माझी आहे. आमदार असताना नगरोत्थान योजनेतून ४० कोटीचा निधी आणला होता, त्यातून रस्त्याची कामे केली. पाणी पुरवठा योजना पूर्ण व्हावी यासाठी प्रयत्न केले. पालकमंत्री असताना खूप विकास करायचा होता पण पालिका ताब्यात नसल्याने शक्य झाले नव्हते. आता संघर्ष करण्यापेक्षा दोघे मिळून शहराच्या विकासासाठी एकत्र आलो आहोत, पालिकेच्या माध्यमातून शहराला विकासाच्या एका उंचीवर नेऊ. रस्ते, नाल्या, समाज मंदिर बांधण्याबरोबरच माणसं जोडण्याचे काम देखील आम्ही करणार आहोत यासाठी महायुतीच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणा असं आवाहन त्यांनी केलं.

### प्रभाग २१ ब मधील...

मित्रपक्षांची मजबूत साथ गुंजाळ यांना मिळत आहे. जनसमर्थनाची ही लाट आता अधिक जोमाने पुढे सरकते आहे. बाळासाहेब गुंजाळ यांना विजयी करण्याचा निर्धार नागरिकांनी स्पष्ट केला आहे. प्रत्येक गल्लीत, प्रत्येक घरामध्ये आता एकच नारा दिला जात असून गुंजाळ यांना निवडून आणण्याचा मनोदय मतदार बोलून दाखवत आहे.

### डॉ. सुखदेव थोरात...

समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ना. छगनराव भुजबळ साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीत माजी केंद्रीय मंत्री खा. उपेंद्र कुशवाहा यांच्या शुभहस्ते तसेच माजी खा. समीरभाऊ भुजबळ आणि आ. पंकजभाऊ भुजबळ यांच्या उपस्थितीत सदरील पुरस्काराचे वितरण होणार आहे. यावर्षी अर्थशास्त्रज्ञ , शिक्षणतज्ज्ञ , प्राध्यापक, लेखक आणि सामाजिक चवळीचे अभ्यासक डॉ. सुखदेव थोरात २२ व्या समता पुरस्काराचे मानकरी असून ते विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष आहेत. तसेच जवाहरलाल नेहरू विद्यापीठातील सेंटर फॉर द स्टडी ऑफ रीजनल डेव्हलपमेंट येथे मानद प्राध्यापक आहेत. ते १९९२ पासून वॉशिंग्टन डीसी येथील आंतरराष्ट्रीय अन्न धोरण संशोधन संस्थेचे संशोधन सहकारी आहेत. जानेवारी २००३ ते फेब्रुवारी २००६ पर्यंत नवी दिल्ली येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ दलित स्टडीजचे संचालक होते. २००६-२०११ पर्यंत त्यांनी यूजीसीचे अध्यक्ष म्हणून काम पाहिले. डॉ. थोरात यांनी कौन्सिल फॉर ॲडव्हान्समेंट ऑफ पीपल्स ॲक्शन अँड रुरल टेक्नॉलॉजी (उ-झ-ठढ), नियोजन आयोगाचा सामाजिक न्याय विभाग, बाबासाहेब भीमराव आंबेडकर विद्यापीठाची शैक्षणिक परिषद,डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ , बुद्धिस्ट स्टडीज सेंटर, हैदराबाद विद्यापीठ , हिमाचल प्रदेश विद्यापीठ आणि इतर अनेक संस्थांच्या प्रशासकीय मंडळांमध्ये सदस्य म्हणून काम केले आहे. थोरात हे भारतीय सामाजिक विज्ञान आणि संशोधन परिषदेचे अध्यक्ष देखील होते. खाजगी क्षेत्रातील आरक्षणाविषयी वादचर्चा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर : सामाजिक बहिष्कृतता व समावेशकता धोरणाविषयीचा दृष्टिकोन, बाबासाहेब आंबेडकर नियोजन जल व विदयुत विकास भुमिका व योगदान, भारतातील दलित समाज, महाराष्ट्रातील विषमता आणि गरिबी सांपत्तिक असमानता व जातीय भेदभावाचा प्रभाव आदी विषयांवर त्यांनी प्रभावी लेखन केले असून त्यांना यापूर्वी डॉ.बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्कार (२०११), पद्मश्री (२००८), डॉ. आंबेडकर चेतना पुरस्कार आदी पुरस्कारांनी गौरविण्यात आलेले आहे. तरी आज शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी समता भूमी महात्मा फुले स्मारक पुणे - ४२ येथे सकाळी ९:३० वाजता संपन्न होणाऱ्या समता पुरस्कार - २०२५ वितरण सोहळ्यास याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ड. सुभाष राऊत यांनी केले आहे.

### बीड शहराच्या शाश्वत...

आहे. नागरिकांचा संताप मतदानाच्य रूपाने बाहेर पडेल. शहराचा शाश्वत आणि सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार आणि शिवसेना उबाठा महाविकास आघाडीच्या नगराध्यक्ष उमेदवार सौ स्मिता विष्णू वाघमारे व सर्व नगरपरिषद सदस्य उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन राष्ट्रवादी जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

### प्रभाग १६ मध्ये...

प्रचारामुळे अक्रम बागवान हे चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत. प्रभाग १६ मध्ये वाढते जनसमर्थन पाहता त्यांच्या उमेदवारीला चांगली गती मिळाल्याचे राजकीय जाणकारांकडून व्यक्त केले जात आहे.आता दोन तारखेला होणाऱ्या मतदानात नागरिक कोणावर विश्वास ठेवतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### उद्या फडणवीस...

निवडणुकीच्या रिंगणात असलेले उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या जाहीर सभेमुळे भाजपच्या प्रचाराला मोठी ऊर्जा मिळणार असून, पक्षाच्या पारड्यात निर्णायक मताधिक्य पडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नगरपालिका निवडणुकीसाठी भाजपने विकासाचा मुद्दा केंद्रस्थानी ठेवून प्रचाराचा वेग वाढवला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सभेमुळे मतदारांमध्ये सकारात्मक संदेश जाण्याची अपेक्षा भाजप कार्यकर्त्यांकडून व्यक्त केली जात आहे. या सभेच्या माध्यमातून शहरातील विकासकामे, पुढील नियोजन तसेच केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती थेट नागरिकांपर्यंत पोहोचवली जाणार आहे. दरम्यान, मुख्यमंत्री, मंत्री, आमदार आणि स्थानिक नेत्यांच्या उपस्थितीत होणारी ही सभा निवडणुकीच्या प्रचारात निर्णायक ठरण्याची शक्यता असून, बीडच्या राजकीय वातावरणात मोठी हालचाल निर्माण झाली आहे.

### प्रभाग ११ मध्ये आमराई...

चाऊस हे शांत, संयमी, प्रामाणिक आणि लोकाभिमुख कार्य करणारे उमेदवार आहेत. प्रभागाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांची निवड आवश्यक आहे. मुदस्सिर चाऊस यांच्या उत्कृष्ट खेळाडू म्हणून असलेल्या ओळखीमुळे युवा पिढी त्यांच्याभोवती एकवटली आहे. कुटुंबाची सामाजिक वारसा, लोकसेवेची परंपरा आणि त्यांची विनम्र व्यक्तिमत्त्वामुळे प्रभागातील प्रत्येक घराघरात त्यांची सकारात्मक चर्चा सुरू आहे.महिलावर्गाचा एकतर्फी कल, युवकांचा प्रचंड उत्साह आणि पोलीस बॉईज संघटनेच्या संस्थापक अध्यक्षांचा ठाम पाठींबा- या सर्व घटकांमुळे प्रभाग ११ मध्ये मुदस्सिर चाऊस विजयाच्या दिशेने मोठ्या वेगाने वाटचाल करत आहेत, असे चित्र अधिक ठळक होत आहे.

### शहरातील प्रभाग २३...

करत असल्याचे चित्र दिसत आहे.प्रभागातील प्रश्नांवर तोडगा काढण्याचे आश्वासन, विकासाचा ठोस दृष्टीकोन आणि लोकांशी साधलेला आपुलकीचा संवाद यामुळे हाफिज अशफाक यांना प्रभाग २३ मध्ये चांगला प्रतिसाद मिळत असून त्यांच्या प्रचाराला दिवसेंदिवस अधिक गती प्राप्त होत आहे.निवडणुकीची टक्कर रंगत चालली असून प्रभाग क्रमांक २३ मध्ये कोण बाजी मारणार याकडे आता सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

### बाळासाहेब गुंजाळ यांना...

भाग असल्यामुळे बाळासाहेब गुंजाळ हे हक्काचे नगरसेवक म्हणून ओळखले जात आहेत. आधी केलेल्या कामांचे प्रत्यक्ष फायदे मतदारांना अनुभवायला मिळत असल्याने त्यांना जनतेचा पाठिंबा मिळू लागला आहे. प्रत्येक समस्या स्वतः पाहून घेणे आणि तत्काळ तोडगा काढण्याचा प्रयत्न ही त्यांची मजबूत बाजू मानली जाते. मतदारांच्या विविध घटकांमध्ये चांगली संघटन जोडणी, युवक, महिलावर्ग आणि ज्येष्ठ मतदारांमध्ये संवाद वाढवल्याने त्यांचा प्रचार सर्वसमावेशक होत आहे. स्वच्छ प्रतिमा आणि सरळ साधेपणा, राजकारणात असूनही जमिनीवरचा नेता अशी बाळासाहेब गुंजाळ यांची ओळख आहे. त्यामुळेच बाळासाहेब गुंजाळ यांच्या माध्यमातून हक्काचा माणूस म्हणून त्यांनाच निवडून देण्याचा निर्धार नागरिकांनी केला आहे.

# नरेगा वर्ककोड डिलीट; लाभार्थ्यांसाठी तातडीने उपाययोजनांची मागणी

## शिवसेना जिल्हाप्रमुखांच्या मार्गदर्शनाखाली सतीश शेळके यांची निवेदनद्वारे मागणी



## लाभार्थ्यांनी तात्काळ पंचायत समिती येथे कागदपत्रांसह संपर्क साधावा

**बीड । प्रतिनिधी**

नरेगा योजनेअंतर्गत राजुरी नवगण व कामखेडा गणातील सर्व प्रकारच्या कामांचे वर्क कोड डिलीट झाल्याने लाभार्थ्यांपुढे मोठे संकट निर्माण झाले आहे. अनेक गावांमध्ये कामे थांबली असून मजुरांना रोजगार मिळण्यात अडचणी येत आहेत. या गंभीर प्रश्नी तातडीने कार्यवाही करून निलंबित कामे सुरू करणे व मस्टर तात्काळ चालू करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासाठीचे निवेदन वरिष्ठ अधिकाऱ्यांना सादर करण्यात आले. शिवसेना जिल्हाप्रमुख श्री. अनिलदादा जगताप साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. सतीश शेळके पाटील यांच्या वतीने मा.ना. श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब, उपमुख्यमंत्री, मा.ना. श्री. भरतशेठजी गोगावले साहेब, मंत्री रोजगार हमी योजना यांनी मा. आयुक्त साहेब, नरेगा विभाग, नागपूर, मा. जिल्हाधिकारी साहेब, बीड, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब, जि.प. बीड, मा. उपजिल्हाधिकारी साहेब (रोहयो), बीड, मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी साहेब (पंचायत), जि.प. बीड सत्वर कार्यवाहीसाठी आदेशीत केले आहे. तसेच गटविकास अधिकारी श्री.राठोड साहेब यांनी लाभार्थ्यांना महत्त्वाची सूचना दिली आहे. कामांच्या पुनर्मंजुरीसाठी (दुबार वर्क कोड) मूळ संचिका व चालू तारखेचा ७/१२ उतारा घेऊन तातडीने पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा, असे त्यांनी आवाहन केले. राजुरी नवगण व कामखेडा गणातील सर्व गावांना वर्क कोड डिलीट होण्याचा मोठ्या प्रमाणात फटका बसला असून पुनर्मंजुरी प्रक्रिया सुरू आहे. त्याचबरोबर मजुरांना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी मस्टर तात्काळ सुरू करण्याची मागणी निवेदनात स्पष्टपणे करण्यात आली. लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे लवकरात लवकर जमा करून प्रक्रिया पूर्ण करावी, असे प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.

# प्रभाग २३ मध्ये अपक्ष उमेदवार शेख जाफर यांच्या पदयात्रेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**बीड । प्रतिनिधी**

**बीड नगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी शिगेला पोहोचली असून येत्या दोन तारखेला होणाऱ्या मतदानामुळे शहरातील वातावरण चांगलेच तापले आहे. सर्वच राजकीय पक्षांसह अपक्ष उमेदवारही जोरदार प्रचारात गुंतले आहेत. अशात प्रभाग क्रमांक २३ मध्ये वेगळेच चित्र पाहायला मिळत आहे.**

या प्रभागातून रोड रोलर या चिन्हावर निवडणूक लढवणारे अपक्ष उमेदवार शेख जाफर यांच्या प्रचारयात्रेला नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या आयोजित पदयात्रा आणि रॅलींना परिसरातील युवक वर्ग तसेच त्यांना मानणारा मोठा समर्थक वर्ग मोठ्या संख्येने सहभागी होत आहे. प्रचारादरम्यान शेख जाफर यांचा साधा आणि जमिनीवरचा दृष्टीकोन नागरिकांना भावत असून विकासाभिमुख आश्वासनांमुळे त्यांच्याबद्दल सकारात्मक चर्चा रंगत आहे. स्थानिक समस्यांवर तोडगा काढण्याचे आश्वासन देत जाफर मतदारांशी थेट संवाद साधत आहेत. प्रभाग २३ मध्ये उत्साहाचे जोरदार वातावरण असून आगामी मतदानात शेख जाफर यांची कामगिरी कशी ठरणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.


# नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार वृषालीताई नितीन जायभाय यांनी दिला वचन नामा

**बीड । प्रतिनिधी**

नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवीत असलेल्या आम आदमी पार्टीच्या उमेदवार वृषालीताई नितीन जायभाय यांनी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केलेल्या तीन प्रश्नांविषयी त्यांच्याकडे वचन नामा दिला. यावेळी नितीन जायभाय यांची प्रमुख उपस्थिती होती. या वचननाम्यात नमूद केले आहे की, आपण प्रसिद्धी माध्यमातून दिलेली बातमी वाचली. त्यात आपण उपस्थित केलेले खासबाग-मोमीनपुरा जोडणारे बिंदुसरा नदीवरील नियोजित पुलाचे निर्माण. ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण व सुशोभीकरण. मोमीनपुरा बायपास येथील महेदवीया दायरा कब्रस्तानच्या तटरक्षक भिंती चे निर्माण. हे तीन प्रश्न दृष्टिक्षेपात आले. यामुळे या पत्राद्वारे बीड नगर परिषदच्या नगराध्यक्षपदासाठी निवडणूक लढवीत असल्याने हे वचन देते की, नगराध्यक्षपदी निवडून आल्यावर आपण उपस्थित केलेल्या तिन्ही प्रश्नांवर प्राधान्य क्रमाने कार्य करून जनसेवेत देण्यात येतील. असा वचननामा बीड नगर परिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक लढवीत असलेल्या उमेदवार वृषाली नितीन जायभाय यांनी मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांना दिला. यावरून वृषालीताई आणि नितीन जायभाय हे दाम्पत्य सामाजिक व सार्वजनिक प्रश्नाविषयी किती दक्ष



आहेत हे दिसून आले. यावेळी बोलताना त्या म्हणाल्या की, माझे पती तथा बीड शहर बचाव मंच चे निमंत्रक नितीन जायभाय यांनी मंचचे पदाधिकारी व सदस्यांसह महेदवीया दायरा कब्रस्तान च्या दुरावस्थेची पाहणी करून कब्रस्तानच्या तट रक्षक भिंती बांधून देण्यासाठी शब्द दिला आहे. नगराध्यक्षपदी निवडून आल्यावर तो पूर्ण करणारच आहे. त्यासोबतच बिंदुसरा नदीवरील पूल आणि ऐतिहासिक कारंजा टॉवर चे नूतनीकरण व सुशोभीकरण सुद्धा करू. तसेच बीड शहराची झालेली अत्यंत बकाल अवस्था दुर करणे, स्वच्छता, पाणीपुरवठा, शासनाकडून जनतेसाठी येणाऱ्या विविध योजनांची परिपूर्ण अंमलबजावणी याकरिता आम्ही बारा कलमी हमीनामा सुद्धा जनतेसाठी दिला आहे. त्यात उल्लेख केलेल्या सर्व मुद्द्यांवर कार्य करण्याची हमी आम्ही घेतली आहे असे म्हटले. यावेळी अनेकांची उपस्थिती होती.



**परळी – शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या पक्ष प्रचार कार्यालयात दीपक देशमुख यांनी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन केले. नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक रणधुमाळीचा प्रचार सुरू असताना, प्रचारास काही दिवस असून ,एवढ्या व्यस्ततेत त्यांनी राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मृती दिनानिमित्त त्यांना पक्ष प्रचार कार्यालयात अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. संध्या दीपक देशमुख व माजी नगराध्यक्ष दीपक रंगनाथ देशमुख तसेच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.**

### दिवंगत शिक्षिका वंदना मनकुलवार पुण्यस्मरणानिमित्त विद्यावर्धिनी विद्यालयात

# प्रेरणासत्र आणि उपजिल्हा रुग्णालयाच्या सहकार्याने मोफत आरोग्य तपासणी

**परळी । प्रतिनिधी**

येथील दिवंगत शिक्षिका वंदना मनकुलवार यांच्या चौथ्या पुण्यस्मरणानिमित्त 'विद्यावर्धिनी विद्यालय' आणि 'वंदना प्रतिष्ठान' यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या प्रांगणात एका प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात माजी विद्यार्थ्यांनी तसेच परळी शहरात कार्यरत असलेल्या डॉक्टर्सनी स्व. मनकुलवार मॅडम यांच्या जुन्या आठवणींना उजाळा देत, उपस्थित विद्यार्थ्यांना उज्ज्वल भविष्यासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमास शाळेच्या 'श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ संस्थेचे उपाध्यक्ष श्री. एस बी भिंगोरे साहेब, सदस्य श्री संजय कराड सर, तसेच श्री विकासराव डुबे 'वंदना प्रतिष्ठाण'चे मार्गदर्शक नागनाथ



पारसेवार, अध्यक्ष राजेश कौलवार आणि सदस्य नंदकिशोर देवशटवार, नंदा पारसेवार यांची उपस्थिती होती. माजी विद्यार्थी व डॉक्टर्सपैकी डॉ. मंगेश गित्ते, डॉ. रविकुमार फड, डॉ. स्वप्नीता गुट्टे(फड), डॉ. आनंद राजाराम मुंडे, डॉ. संकेत बिडवई, डॉ. श्रद्धा अदुडे, डॉ. सुनिल होळंबे, डॉ. साई कराड, डॉ. ज्ञानेश्वरी मुंडे आणि संकेत बडे इत्यादी उपस्थित होते.





**अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने क्रांती सुर्य महात्मा जोतीराव फुले यांच्या स्मृती दिना निमित्त विनम्र अभिवादन करताना समता परिषदेचे शहराध्यक्ष निखिल शिंदे, नितीन राऊत, मंगेश जमदाडे, वैभव(राणा) गोरे, संजय खेत्रे, राहुल लांडगे, सुबोध शिंदे,संतोष संचेती, यांच्यासह समता सैनिक उपस्थित होते.**

# लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखाना चालु हंगामासाठी प्रतीटन रु.२७००रु अंतीम भाव जाहीर

## राज्य बँकेच्या धोरणानुसार पहिली ऊचल प्रतीटन रु.२४००रू. देणार; आ.प्रकाश सोळंके यांची घोषणा



**माजलगाव । प्रतिनिधी**

शेतकरी संघटना व युवा शेतकरी संघर्ष समिती यांच्या प्रतिनिधी समवेत कारखाना सभागृहात झालेल्या संयुक्त बैठकीत सन. २०२५-२६ साठी अंतीम भाव रु.२७००/- प्रती मे.टन आणि राज्य बँकेच्या धोरणानुसार पहिली ऊचल प्रती टन रुपये २४००/- देणार असल्याची घोषणा आ. प्रकाशदादा सोळंके यांनी या बैठकीत केली. कारखान्याचा सन.२०२५-२६ चा गळीत हंगाम सुरु असुन दिनांक २५/११/२०२५ अखेर १,३०,१०० मे.टन ऊसाचे गाळप कारखान्याने केले आहे. कारखाना कार्यक्षेत्रात ऊस भावा संदर्भात युवा शेतकरी संघर्ष समिती व शेतकरी संघटना यांच्या वतीने आंदोलन करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात झालेल्या बैठकीत ऊस दरवाढी बाबतीत ठोस निर्णय होवू न शकल्यामुळे शेतकरी संघटनेने ऊस तोड बंद करुन ऊसाची भरलेली वाहने कारखान्यावर जाण्यासाठी प्रतिबंध केलेला होता. परिणामी यामुळे कारखान्याचे ऊस गाळप दिनांक २६/११/२०२५ पासुन बंद होवुन तुटलेला ऊस वाळत असल्यामुळे ऊस उत्पादकांचे आर्थीक नुकसान होत आहे.शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्यामुळे या पार्श्वभुमीवर दिनांक २८/११/२०२५ रोजी वरील संघटनेचे प्रतिनिधी यांना कारखाना सभागृहात चर्चेसाठी आमंत्रीत करण्यात आले होते. या बैठकीत आ. प्रकाशदादा सोळंके यांनी चालु हंगामासाठी अंतीम भाव प्रती टन रुपये २७००/- आणि राज्य बँकेच्या धोरणानुसार पहिली ऊचल रुपये २४००/- देणार असल्याचे संघटनेस आश्वासीत करून या हंगामाचे १०.०० लाख मे.टन ऊस गाळपाचे उद्दिष्ठ साध्य करण्यासाठी सहकार्य करुन गाळपास येणा-या ऊसा करीता प्रतिबंध न करण्याचे संघटनेच्या प्रतिनिधींना आवाहन केले. या बैठकीस मा.आ.श्री. प्रकाशदादा सोळंके यांच्यासह व्हाईस चेअरमन श्री. जयसिंगभैय्या सोळंके, कारखान्याचे कार्यकारी संचालक, चिफ अकोटंट, मुख्य शेतकी अधिकारी तसेच शेतकरी संघटना, युवा शेतकरी संघर्ष समिती यांचे प्रतिनिधी ड. अजय बुरांडे, कालीदास आपेट, दत्ता डाके, जगदीश फरताडे, मोहन जाधव, अजय राऊत, नामदेव सोजे यांचेसह संघटनेचे इतर प्रतिनिधी उपस्थित होते.

# चार वर्षीय ज़िकरा ज़ाकेर शेख अरबी मध्ये विशेष प्राविण्याने उत्तीर्ण

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील प्रसिद्ध अंबर फॅमिली रेस्टॉरंट चे संचालक ज़ाकेर शेख यांची चार वर्षीय कन्या ज़िकरा ही अरबीमध्ये विशेष प्राविण्याने उत्तीर्ण झाली. याबद्दल तिचे स्मृती चिन्ह व प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. ज़िकरा शेख अरबी भाषेतून शिक्षण घेत आहे. नुकतीच तिची परीक्षा झाली. यात तिने चांगले गुण घेतले. परीक्षेत विशेष प्राविण्याने उत्तीर्ण होणारे विद्यार्थी व विद्यार्थिनींना कारंजा मस्जिद येथे घेण्यात आलेल्या कार्यक्रमात हाफ़ीज़ साद यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. यात ज़िकरा ज़ाकेर शेख हिचे ही



स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. यावेळी शिक्षक वृंदांसह विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रभाग चार मधील भाजपच्या उमेदवारांना मतदारांचा कौल

## माऊली भाऊंचे काम चांगलं मायबाप जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील प्रस्थापित विरुद्ध विस्थापित या प्रभाग क्रमांक चारच्या भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी लढतीकडे सर्व गेवराईकरांचे लक्ष्य लागले आहे. भाजपाच्या नगराध्यक्ष पदाचा अधिकृत उमेदवार सौ गीता त्र्यंबक उर्फ बाळराजे पवार,



नगरसेवक पदाच्या अधिकृत उमेदवार सौ आशा ज्ञानेश्वर वादे व पठाण अन्वर फैरनखा यांचा मतदार सर्वांत दौरा सुरू असून या सवान दौऱ्यास मतदाराचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. गेवराई नगरपरिषद निवडणूक पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक चार मध्ये नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ गीता त्र्यंबक उर्फ बाळराजे पवार व नगरसेवक पदाचे अधिकृत उमेदवार सौ आशा ज्ञानेश्वर वादे व पठाण अन्वर फैरनखा या सवांद दौरा सुरू असून प्रचारात मोठी आघाडी घेतल्याने विरोधकांची डोकेदुखी वाढली आहे. या प्रभागामध्ये माजी नगरसेवक अरुण मस्के व माजी उपनगराध्यक्ष मधुकर रखमाजी वादे यांना मानणारा मोठा वर्ग असुन त्यांनी देखील प्रभाग पिंजून काढला आहे घरोघरी जाऊन तसेच कॉर्नर बैठकीच्या माध्यमातून भाजप उमेदवाराचा जोरदार प्रचार सुरू आहे. भाजपाची सत्ता असताना कोठे होते रुपयाचे विकासकामे या प्रभागात मोठ्या प्रमाणात करण्यात आले आहेत प्रभागाचा कायापालट करण्यासाठी युवा नेते अरुण मस्के, मधुकर वादे यांनी विकासाचा भारत अखंडपणे यापुढेही असाच सुरू ठेवण्यासाठी व स्वच्छ गेवराई सुंदर गेवराई गेवराईच्या विकासाला चालना देण्यासाठी मतदान रुपी आशीर्वाद द्यावे असे आवाहन मतदारांना केले आहे यावेळी मतदार बंधू-भगिनी व भाजपा पदाधिकारी कार्यकर्ते यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# खाकीचे सामाजिक दायित्व; रक्तदान शिबीरात ५६ जणांचे रक्तदान

## २६/११ मधील शहीद जवानांच्या स्मरणार्थ केले रक्तदान

**वडवणी । प्रतिनिधी**

भारतीय संविधान दिन तसेच २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात पोलिस दलातील शहीद झालेल्या जवानांच्या स्मरणार्थ वडवणी पोलिस ठाण्याच्या वतीने दि.२६ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी रक्तदान शिबीर संपन्न झाले. या रक्तदान शिबीरात ५६ रक्तदात्यांनी रक्तदान करुन हे शिबीर यशस्वी केले. २६/११ च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यात पोलिस दलातील शहीद झालेल्या जवानांच्या स्मरणार्थ बीडचे पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत, अप्पर पोलिस अधीक्षक चेतना तिडके, पोलिस उपविभागीय अधिकारी शैलेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली व वडवणी पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांच्या संकल्पनेतून वडवणी पोलिस ठाण्याच्या वतीने दि.२६ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी सकाळी ११ ते ५ या वेळेत वडवणी पोलिस ठाण्याच्या समोरील प्रांगणात रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. समाजातील सामाजिक दायित्वाच्या भावनेतून पोलिस प्रशासनासह



समाजातील सर्व घटकांनी व रक्तदात्यांनी रक्तदान करावे, असे आवाहन वडवणी पोलिस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांनी केले होते. त्यांच्या याच आवाहनाला वडवणीकरांनीही भरभरुन प्रतिसाद देत दिवसभरात या रक्तदान शिबीरातून तब्बल ५६ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यावेळी रक्तदान केलेल्या प्रत्येक रक्तदात्याला वडवणी पोलिस ठाण्याच्या वतीने एक प्रशस्तीपत्र व गुलाब पुष्प देवून त्यांचे आभार मानण्यात आले. तसेच रक्तदात्यांसाठी नाष्ट्याचीही व्यवस्था यावेळी करण्यात आली होती. आपल्या देशासाठी शेवटच्या रक्ताच्या थेंबापर्यंत लढणाऱ्या लढवय्यांच्या आठवणीत रक्ताच्या प्रत्येक थेंबातून एक छोटंसं योगदान देवून आपण दिलेले योगदान कोणासाठी तरी जिवदान ठरु शकते, या समाजभावनेतून आपण केलेले रक्तदान निश्चितच अभिनंदनीय आहे, अशी प्रतिक्रिया याप्रसंगी सहाय्यक पोलिस निरीक्षक वर्षा व्हगाडे यांनी व्यक्त केली. शेवटी वडवणी पोलीस ठाण्याच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले.

# सुरजभैय्यांची वाढवू आन बान आणि शान; नगरपालिका निवडणुकीत निवडून देऊ फक्त धनुष्यबाण

## प्रभाग क्रमांक पाच मधील उमेदवाराला प्रचंड बहुमताने विजयी करा : अनिकेत घाडगे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील प्रभाग क्रमांक ०५ मध्ये घरोघरी जाऊन प्रचार करत उपस्थित राहून सर्वांशी सविस्तर संवाद साधला.शिवसेना पक्षाला मिळणारा प्रतिसाद पाहता घरोघरी धनुष्यबाण विजयाची जान असे बोलले जात आहे यानिमित्त मित्र परिवारांच्या गाठीभेटी घेऊन सवांद साधून प्रभाग क्रमांक ०५ मधील असंख्य तरुणांनी शिवसेनेचा भगवा फडकवण्याचा निर्धार केला असल्याचे दिसून येत आहे. प्रभागाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सुरज भैय्या चुंगडे धनुष्यबाण या चिन्हा समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने निवडून द्या, असेही अनिकेत घाडगे यांनी आवाहन केले.प्रभाग क्रमांक पाच मधीलविकासासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोत. पायाभूत सुविधा आणि मूलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी यापुढेही कटिबद्ध आहे. मात्र, त्यासाठी शिवसेना शिंदे गटाचे अधिकृत उमेदवार सुरज भैय्या चुंगडे धनुष्यबाण या चिन्हा समोरील बटन दाबून या उमेदवाराच्या पाठीशी आपला आशीर्वाद असू द्या. कारण, आपल्या सोबतीनेच प्रभागाचा सर्वांगीण विकास करायचा आहे. त्यामुळे या प्रभागातील माझ्या सुज्ञ माय-बाप जनता सुरज भैय्यांच्या पाठीशी उभी राहून आपला मतदान रुपी आशीर्वाद देईल, असा विश्वास अनिकेत घाडगे यांनी व्यक्त केला.

# सौ.गिताभाभी बाळराजे पवार यांना प्रचंड मतांनी निवडून देऊन विजयाचे साक्षिदार व्हा : योगेश मोटे

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई नगरपरिषद निवडणूक प्रचाराच्या निमित्ताने स्थानिक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांशी संवाद साधत गेवराई शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या महत्त्वांच्या मुद्द्यांवर माऊली ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष श्री .योगेश दिलीपराव मोटे यांनी संबोधित केले.



गेवराईच्या सर्वांगीण प्रगतीसाठी आपण सर्वजण एकत्रितपणे एकदिलाने काम करू, याची खात्री दिली. जाती आणि धर्मावरून भेदभाव सुरू आहे. माणुसकी हा धर्म आपण सर्वांनी अंगीकारला पाहिजे. आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी सत्ताधारी पक्षाचा हा असलेला केविलवाना प्रयत्न आपण सर्वांनी लक्षात घेऊन याला वेळीच घालण्यासाठी आणि लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी खऱ्या अर्थाने पाऊल उचलणं अपेक्षित आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने आपण सर्वांनी लोकशाही अबाधित ठेवण्यासाठी मतदानरूपी आशीर्वाद या उमेदवारांच्या पाठीशी ठेवावा.भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ. गीता त्र्यंबक उर्फ बाळराजे पवार यांना आणि नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांना कमळ या चिन्ह समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करा, असे आवाहन केले. गेवराई आदर्श शहर बनविण्यासाठी गेल्या काही वर्षात महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आले. विकास निधीचा योग्य वापर व पुढील २५ वर्षात आदर्श शहर बनविण्यासाठीची पायाभरणी करताना पहिल्या टप्प्यातील कामे करण्यात आली आहेत. हे सर्व करत असताना गेवराई शहरातील नागरिक हाच केंद्रबिंदू ठेवण्यात आला आहे. भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवार सौ. गीता त्र्यंबक उर्फ बाळराजे पवार यांना आणि नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांना कमळ या चिन्ह समोरील बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करा, असे आवाहन केले.

# बीड न.प.वर राष्ट्रवादी व शिवसेना आघाडीचा झेंडा फडकवा : गोरख सिंघन

**बीड । प्रतिनिधी**

येत्या २ डिसेंबर रोजी बीड न.प. मधील सर्व प्रभागातील व नगराध्यक्ष पदाचे मतदान होत आहे,प्रचार यंत्रणा हि अंतिम टप्प्यात आली असून, शहरात सर्वत्र तुतारी व मशाल यांचाच बोलबाला बघायला मिळत असुन मतदारांनीच हि निवडणूक हातात घेतली आहे, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे साहेब व शरदचंद्र पवार यांच्या विचारांवर लोकांचा विश्वास आहे,तसेच स्थानिक आमदार संदिप भैय्या क्षीरसागर यांच्या



कामाची पध्दत व रात्रीबेरात्री कुणाच्याही मदतीला धावून जाणारा सर्वसामान्य लोकांच्या अडचणीला उभा रहाणारा लोकनेता अशी लोकांची भावना झालेली आहे तसेच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचेही जिल्हाप्रमुख व पदाधिकारी हे सर्वसामान्य लोकांनला मदत करतात, रात्री अपरात्री धावून येतात हे लोकांना कळून चुकले आहे, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार स्मिताताई विष्णु वाघमारे हया गेल्या ३० वर्षांपासून न.प. मध्ये काम करतात , त्यांना खुप मोठा अनुभव आहे त्यामुळे लोकांनची पसंती त्यांना मोठ्या प्रमाणावर आहे, त्यामुळे मायबाप मतदार बंधु भगिनींनो या सर्व बाबींचा विचार करून येणाऱ्या २ डिसेंबर रोजी मशाल व तुतारी या चिन्हासमोरील बटन दाबुन न.प. वर आपल्या हक्काची व सर्वसामान्य असलेली माणसं मोठ्या मताधिक्याने विजयी करा असे आवाहन शिवसेनेचे बीड तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी केले आहे.

दै.बीड सुपरफास्ट www.beedsuperfast.com

रविवार दि. ३० नोव्हेंबर, २०२५ पान ४

## प्रसिद्धीसाठी बिनबुडाचे आरोप थांबवा!
### आ. सुरेश धस यांच्यावर खोटे आरोप-माऊली जरांगे



**पाटोदा । प्रतिनिधी**

राम खाडे यांच्यावर झालेल्या प्राणघातक हल्ल्याच्या प्रकरणात आमचे दैवत असलेल्या आमदार सुरेश धस यांचे नाव विनाकारण पुढे केले जात असल्याचा तीव्र निषेध अंमळनेर जि.प. सदस्य माऊली जरांगे यांनी व्यक्त केला आहे. जरांगे म्हणाले की,केवळ प्रसिद्धीसाठी कोणत्याही व्यक्तीने खोटे,आधारहीन आणि पातळीहीन आरोप करून आमचे लोकनेते आ. सुरेश धस यांची प्रतिमा मलिन करण्याचा प्रयत्न केला, तर तो आम्ही कधीच सहन करणार नाही. या प्रकरणाशी आमदार धस यांचा काहीच संबंध नसताना, हेतुपुरस्सर त्यांचे नाव सोशल मीडियावर पुढे केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. हा प्रकार अत्यंत संतापजनक आणि » पान २ वर

# गेवराईत पवारांनी काय केलं म्हणणाऱ्यांना जनता मतपेटीतून उत्तर देईल - बाळराजे पवार



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराईत विकासाची खरी गंगा वाहिली ती पवारांच्या नेतृत्वातच. आम्ही काय केलं म्हणता ना तर आणांनी आणलेल्या दहा वर्षांच्या निधीचे आकडे सांगितले तर तुम्हाला त्याचा हिशोबही लावता येणार नाही. म्हणून आम्ही काय केलं असा सवाल विचारणाऱ्या अमरसिंह पंडितांना गेवराईची जनता येत्या २ तारखेला मतपेटीतून जबरदस्त उत्तर देईल असे प्रतिपादन भाजप नेते बाळराजे पवार यांनी केले. भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी त्रिंबक (बाळराजे) पवार तसेच प्रभाग क्रमांक ४ व ५ मधील उमेदवारांच्या प्रचारार्थ सावता नगर येथे पार पडलेल्या भव्य कॉर्नर सभेत भाजप नेते बाळराजे पवार यांनी अमरसिंह पंडित यांच्यावर झणझणीत टीका करत संपूर्ण वातावरण तापवले.यावेळी व्यासपीठावर नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ. गीताभाभी पवार, माजी मंत्री बदामराव पंडित, युध्दाजित पंडित, प्रा. पी.टी. चव्हाण, ऍड. भगवान घुंबार्डे, अमोल करांडे, बाबा पिसाळ, सचिन दाभाडे, यशराज पंडित, बाळासाहेब सानप, अरुण मस्के, अन्वरखा पठाण, सुशील जवंजाळ, राजेंद्र राक्षसभुवनकर समेत अनेक मान्यवर उपस्थित होते.सभेत पुढे बोलताना बाळराजे पवार म्हणाले, विकास हा आमचा धर्म; कामांची गुणवत्ता हेच आमचं उत्तर आहे. म्हणून मागील काळात केलेल्या विकासकामांच्या जोरावर जनता पुन्हा विश्वास दाखवत असून त्यामुळे काही जणांची पोटदुखी वाढल्याची टीका त्यांनी केली. गेवराई शहर जात-धर्माच्या राजकारणावर चालत नाही, सर्व गेवराईकर एकजूट आहेत, असेही ते म्हणाले.

अमरसिंह पंडित यांच्यावर गंभीर आरोप करत पवार म्हणाले, त्यांच्या संस्थेतील काही शिक्षक प्रभागात जाऊन पैसे वाटत आहेत. असे शिक्षक तरुण पिढीला काय शिकवणार? हेच त्यांच्या मूल्यांचे खरे दर्शन आहे. मला म्हणता तुमच्या भाषेचा स्तर घसरला आहे अरे तुमच्याबद्दल चांगलं बोलण्यासारखं आहेच काय? लक्ष्मण पवारांनी मंजूर केलेल्या कामांमधून कोट्यवधींची टक्केवारी वसूल करणारे हे लोक विकासाबद्दल » पान २ वर

## प्रभाग १६ मध्ये अक्रम बागवान यांचा पंजा विजय खेचून आणणार!

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी चांगलीच रंगात आली असून येत्या २ तारखेला होणाऱ्या मतदानासाठी सर्वच पक्षांनी कंबर कसली आहे. शहरातील प्रत्येक प्रभागात उमेदवार नागरिकांच्या दारात जाऊन प्रचार करत आहेत. प्रभाग क्रमांक १६ मध्ये मात्र भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे उमेदवार अक्रम बागवान विशेष चर्चेत आहेत.



अक्रम बागवान हे यंदा काँग्रेस पक्षाच्या 'पंजा' या निवडणूक चिन्हावर नगरसेवक पदाची निवडणूक रिंगणात लढवत आहेत. गेल्या काही दिवसांपासून ते प्रभागामध्ये डोअर टू डोअर प्रचार करत असून नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत. त्यांच्या या संवादात्मक प्रचाराला प्रभागातील मतदारांकडून उस्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

स्थानिक नागरिकांच्या समस्या ऐकून घेणे, प्रभागातील मूलभूत सुविधांसंदर्भातील त्यांच्या अपेक्षा जाणून घेणे आणि काँग्रेस पक्षाच्या कार्यधोरणाची माहिती देणे, अशा सकारात्मक » पान २ वर

## डॉ. सुखदेव थोरात २२ व्या समता पुरस्काराचे मानकरी!
### वितरण सोहळ्याला उपस्थित रहावे-ॲड.राऊत

**बीड । प्रतिनिधी**



अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या २२ व्या समता पुरस्कार वितरण सोहळा आज शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५ रोजी समता भूमी महात्मा फुले स्मारक पुणे - ४२ येथे सकाळी ९:३० वाजता संपन्न होत असून याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस सुभाष राऊत यांनी केले आहे. या पुरस्कारा वितरण सोहळयाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे उपमुख्यमंत्री ना. अजित दादा पवार हे राहणार असून राज्याचे माजी उपमुख्यमंत्री तथा » पान २ वर

## दुखापतीवर मात!; हात फ्रॅक्चर असतानाही उपसंपादक शेख तालिब प्रचारात सक्रिय

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या रॅलीदरम्यान किरकोळ अपघात; विकासाची घडी बसवण्यासाठी उमेदवार प्रेमलताई पारवे यांच्यासाठी संघटन मजबूत करण्यात व्यस्त

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांच्या नुकत्याच झालेल्या मोटर सायकल रॅलीदरम्यान बीड शहरात 'दैनिक सिटीझन पेपर'चे उपसंपादक आणि संपादक शेख मुजीब यांचे विश्वासू सहकारी शेख तालिब यांच्या गाडीला किरकोळ अपघात झाला. या अपघातात त्यांच्या हाताला दुखापत झाली असून, तो फ्रॅक्चर झाल्याचे निष्पन्न झाले आहे. अपघातामुळे हाताला फ्रॅक्चर होऊनही, शेख तालिब यांनी आपल्या दुःखावर मात केली आहे. त्यांची विकासाची घडी बसवण्यात असलेली तत्परता आजही कायम आहे. शारीरिक वेदना आणि दुखापत असतानाही, ते सध्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या प्रचारात पूर्ण ताकदीने उतरले



आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना, शिव संग्राम आणि मित्र पक्षांचे नगराध्यक्षपदाच्या उमेदवार प्रेमलताई पारवे आणि सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्यासाठी ते संघटन मजबूत करण्याच्या कामात व्यस्त आहेत. शेख तालिब यांचा दुखापतीनंतरही प्रचारातील हा सक्रिय सहभाग उमेदवारांसाठी मोठे बळ देणारा ठरत आहे. त्यांचा हा समर्पित भाव बीडमध्ये विकास घडवून आणण्यासाठी कटिबद्ध असल्याचे दर्शवितो.

## बीड शहराच्या शाश्वत विकासासाठी राष्ट्रवादीच्या तुतारीला मतदान करा-मस्के
### आ.संदीपभैया गांधीनगर परिसराचा कायापालट करतील

**बीड । प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ह्या कार्यकर्त्यां साठी असतात. नागरीकांचे प्रश्न डोळ्यासमोर ठेवून, विकासाचे धोरण घेऊन निवडणुकीला सामोरे गेले पाहिजे. परंतु दुर्दैवाने बीड मध्ये असे घडताना दिसत नाही. काही लोकांनी आपला राजकीय हेतू डोळ्यासमोर ठेवला. स्वतःचे अस्तित्व निर्माण करण्यासाठी जनतेला गृहीत धरून राजकीय रिंगणात उतरले आहेत. त्यांना विकासाची चिंता नाही अथवा जनतेच्या भल्याची ही चिंता नाही. गांधीनगर हा बीड शहराचा विस्तारित भाग. या भागात गोरगरीब जनता मोठ्या प्रमाणात राहते. या भागात रस्ते पाणी लाईट मूलभूत सुविधांची सुव्यवस्था पोहोचलेली नाही. आगामी काळात या भागाचा कायापालट करण्यासाठी आ. संदीपभैया क्षीरसागर ,सलीम भाई बीड



नगरपालिकेच्या माध्यमातून विकासाला गती देतील असा विश्वास यावेळी राजेंद्र मस्के यांनी दिला. काल गांधीनगर प्रभाग क्र. २६ (अ) व २६ (ब) मध्ये आघाडीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ भव्य कॉर्नर सभा आमदार संदीप भैय्या क्षीरसागर, माजी आमदार सय्यद सलीम भाई, राजेंद्र मस्के,शिवसेना (उबाठा) जिल्हाप्रमुख गणेशराव वरेकर, परमेश्वर सातपुते, वैजनाथ तांदळे तसेच आघाडीचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत संपन्न झाली. या सभेला गांधीनगर परिसरातील नागरिकांनी प्रचंड गर्दी केली होती. कॉर्नर बैठकीला सभेचे स्वरूप आले बीड शहरातील जनता स्वच्छता, धुळ, पिण्याच्या पाण्याची गैरसोय अशा मूलभूत समस्येने ग्रासीत झाला असून प्रचंड संताप जनतेच्या मनात » पान २ वर

## प्रभाग २१ ब मधील मतदारांची बाळासाहेब गुंजाळ यांना खंबीर साथ
### मतदारांचा ठाम निर्धार ; विकास थांबू देणार नाही ; घडीवरची साथ कायम!



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर पालिका निवडणूक अंतिम टप्प्यात असताना प्रभाग २१ ब मध्ये एकच नाव सर्वांच्या ओठांवर आहे ते म्हणजे बाळासाहेब गुंजाळ. गेल्या काही वर्षांत प्रभागात केलेल्या विकासकामांची साक्ष स्वतः नागरिकच देत आहेत. म्हणूनच आज सर्व समाजघटकातून काम करणाऱ्यांची साथ सोडायची नाही असा निर्धार केला जात आहे. बीड शहरातील प्रभाग क्र. २१ ब मध्ये बाळासाहेब गुंजाळ यांनी रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता, सामाजिक उपक्रम राबविले. प्रत्येक ठिकाणी गुंजाळ यांच्या कामाचा ठसा दिसत आहे. प्रभागातील तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक, सर्व जाती-धर्मातील कुटुंबे - सर्वांनीच गुंजाळ यांच्यावरचा विश्वास पुन्हा दृढ केला आहे.मतदारांच्या भावना एकाच दिशेने झेपावत आहेत. विरोधक कितीही आले तरी कामापुढे शब्द चालत नाहीत घडीवर विश्वास आहे ही भावना प्रत्येक मतदारांच्या मनात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि शिवसंग्राम या » पान २ वर

## परळीचा विकास जिंकावा यासाठीच कमळ-घड्याळ एकत्र
### ना. पंकजाताई मुंडे यांच्या कॉर्नर सभांना मतदारांचा जोरदार प्रतिसाद

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांपासून ते आतापर्यंत परळी शहराच्या जडणघडणीत आणि प्रत्येक विकासावर 'मुंडे' हे नाव कोरलेले आहे. इथला विकास जिंकावा यासाठी आम्ही दोघे एकत्र आलो आहोत, येणाऱ्या काळात आम्ही शहराला विकासाच्या एका उंचीवर नेऊ यासाठी महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणा



असं आवाहन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी केले आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी आज महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी तसेच नगरसेवक पदाचे प्रभाग १० मधील उमेदवार सरोज डावरे, » पान २ वर

**दैनिक बीड सुपरफास्ट** हे पत्र मुद्रक बालाजी मारुती खैरमोडे यांनी प्रकाशक व मालक **अतुल शंकरराव जाधव** यांच्यासाठी बालाजी प्रिंटर्स ॲण्ड पब्लीकेशन, हनुमान नगर, अंबाजोगाई, जि. बीड, ४३१५१७ (महाराष्ट्र राज्य) येथून छापून, **दैनिक बीड सुपरफास्ट** कार्यालय, नगर पालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, ब्लॉक नं. ४१, मोहन टॉकीजसमोर, परळी रोड, अंबाजोगाई, तालुका : अंबाजोगाई, जिल्हा बीड ४३१५२३ (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. **संपादक : अतुल शंकरराव जाधव**

Printed By BALAJI MARUTI KHAIRMODE and published by ATUL SHANKARRAO JADHAV on behalf of DAILY BEED SUPERFAST (Name of Owner) ATUL SHANKARRAO JADHAV and printed at BALAJI PRINTERS AND PUBLICATION HANUMAN NAGAR AMBAJOGAI TALUKA AMBAJOGAI DISTRICT BEED 431517 (MAHARASHTRA STATE) (place of printing) and Published at AMBAJOGAI DISTRICT BEED (MAHARASHTRA STATE) (place of publication) 'BEED SUPERFAST' OFFICE : NAGAR PALIKA SHOPPING COMPLEX, BLOCK NO 41, FRONT OF MOHAN TAKIES, PARLI ROAD, AMBAJOGAI, TALUKA AMBAJOGAI, DISTRICT BEED, PIN - 431517 (MAHARASHTRA STATE) editor ATUL SHANKARRAO JADHAV